लोकमत

# उ. प्रदेश, बिहारपेक्षाही महाराष्ट्र वंचित

## प्रा. नीरज हातेकर, डॉ. सविता कुलकुर्णी यांच्या संशोधनातून स्पष्ट

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गाव पातळीवरील पायाभूत सुविधांच्या निकषानुसार देशभरातील प्रमुख राज्यांचा अभ्यास करण्यात आला. यात गावात किंवा गावापासून १० किलोमीटरच्या अंतरात असलेल्या सुविधांचा अभ्यास करण्यात आला. यात अंगणवाडी, शाळा, महाविद्यालय, आरोग्य केंद्र, बँक आदी पायाभूत सुविधा गावापासून किती अंतरावर आहेत हे तपासले असता उत्तर प्रदेश, बिहारपेक्षाही महाराष्ट्र अधिक वंचित असल्याचे वास्तव समोर आले आहे.

बंगळुरू येथील अझीम प्रेमजी विद्यापीठातील प्रा. नीरज हातेकर आणि गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थेतील संशोधक डॉ. सविता कुलकुर्णी यांनी हा अभ्यास केला. याच संशोधनावर आधारित 'प्रादेशिक विषयमतेचा नवा व्यास' हे पुस्तक त्यांनी लिहिले असून, द युनिक फाऊंडेशनने ते पब्लिश केले आहे. गोखले इन्स्टिट्यूटने द युनिक फाऊंडेशनच्या सहकार्याने आयोजित

> व्यावसायिक प्रशिक्षण, एसएससी शाळा आणि स्वच्छता या पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेच्या बाबतीत महाराष्ट्र इतर राज्यांपेक्षा मागे असल्याचे संशोधन आणि निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. रात्रीच्या दिव्यांची चमक पाहूनदेखील तेथील वंचिततेचे प्रमाण निश्चित करण्यास मदत होते. जिथे प्रकाशाचा तेज कमी, तिथे वंचितता जास्त दिसते.
>
> **- प्रा. नीरज हातेकर, ज्येष्ठ अभ्यासक**

परिसंवादात प्रा. हातेकर यांनी सविस्तर मांडणी केली. गोखले इन्स्टिट्यूट येथे हा परिसंवाद पार पडला. यात प्रा. सुहास पळशीकर यांनीही सविस्तर मांडणी केली. अध्यक्षस्थानी गोखले इन्स्टिट्यूटचे कुलगुरू डॉ. अजित रानडे होते. या प्रसंगी पुस्तकाच्या सहलेखिका डॉ. सविता कुलकर्णी यांनी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे महत्त्व अधोरेखित करून पुरेशा सुविधांशिवाय देशाचा आर्थिक विकास कठीण आहे, असे स्पष्ट केले.

प्रा. सुहास पळशीकर म्हणाले की, डेटा गोळा करीत असताना एका गावात पक्का रस्ता आहे, जो पावसाळ्यानंतर वाहून जातो किंवा अशा शाळा आहेत ज्यात शौचालये आहेत; पण, वापरात नाहीत, असा डेटा गोळा करून केलेल्या निष्कर्षाला मर्यादा येतात. तेव्हा डेटा अचूक बनविण्यासाठी जमिनीवरच्या विसंगती शोधण्यासाठी उपाय शोधावे लागतील.

कुलगुरू डॉ. रानडे यांनी आर्थिक आव्हाने अत्यंत सूक्ष्म पातळीवर हाताळतानाच राजकीय यंत्रणेचे महत्त्व अधोरेखित केले. यासाठी प्रा. हातेकर आणि प्रा. पळशीकर या दोघांनी सामायिक केलेल्या मुद्द्यांचा संदर्भ दिला. संवादात्मक प्रश्नोत्तराने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन द युनिक अकॅडमीचे भारत पाटील यांनी केले, तर गोखले इन्स्टिट्यूट सहायक प्राध्यापक पूजा ठाकूर यांनी आभार मानले.



गोखले इन्स्टिट्यूट येथे बोलताना डॉ. सविता कुलकर्णी. या प्रसंगी मंचावर (डावीकडून) द युनिक अकॅडमीच्या मुक्ता कुलकर्णी, प्रा. नीरज हातेकर, डॉ. अजित रानडे, प्रा. सुहास पळशीकर.